# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF/AZ/JLN/ 163/2008/84** **Date:-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer,**
**MSEDCL, JALNA**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Bhagwan Bhavarlal Diama, r/o Nehru Road, Jalna

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Bhagwan Bhavarlal Diama, r/o Nehru Road, Jalna

You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with related documents.

**The hearing in this matter is kept on 06/01/2009 at 15=00 Hrs.**

**Member/Secretary**
Consumer Grievance Redressal Forum,
MSEDCL (AZ) Aurangabad.

**Encl As above**.

Copy to :

Shri Bhagwan Bhavarlal Diama,
2-7-12, Nehru Road, Jalna

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/जालना/१६३/२००८/८४**

**तक्रार दाखल दिनांक ;- १८/१२/२००८**
**निकाल दिनांक ;- ०५/०३/२००९**

**श्री भगवान भवरलाल दायमा,**
**२-७-१२,नेहरू रोड जालना,**
**जिल्हा जालना.**
**(ग्राहक क्र.५१००३०१६२८३६) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**जालना.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १८/१२/२००८ रोजी जालना मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, जालना यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०६/०१/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदार हे जालना येथील रहिवाशी असुन त्यांनी जालना नगरपरीषद हद्दीतील सिटी सर्व्हे क्रमांक ४२७५ वर असलेली श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल यांची मालमत्ता खरेदी केली.या खरेदीची नोंद दिनांक ०२/०३/२००५ रोजी घेण्यात आली असुन रजिस्टी क्रमांक ७९४/२००५ असा आहे. दिनांक ३१/१२/२००५ रोजी अर्जदाराने योग्य त्या कागदपत्रासह महावितरण कंपनीच्या संबंधीत विभागाकडे नवीन वीज पुरवठा मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला. महावितरणच्या संबंधित विभागाने त्यांना दिनांक १८/०१/२००६ च्या पत्राद्वारे श्री लक्ष्मण किसन गोरंटयाल यांच्याकडे असलेली थकबाकी रूपये १,९३,३२० भरल्याशिवाय वीज पुरवठा करता येणार नाही असे कळविले. अर्जदाराच्या म्हणन्यानुसार त्यांनी महावितरणच्या संबंधीत कार्यालयाकडे जुनी थकबाकी ही लक्ष्मण किसण गोरटयाल यांच्याकडुन वसुल करण्याबाबत विनंती केली. महावितरण कंपनीने त्याची दखल न घेतल्यामुळे त्यांनी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीट येथे याचीका दाखल केली. दरम्यानच्या काळात अर्जदाराने महाराष्ट्र वीज नियामक आयोग यांना याबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी विनंतीपत्र लिहीले.अर्जदाराने मा.उच्च न्यायालय,औरंगाबाद येथे दाखल केलेली याचीका परत घेतली व तक्रार या मंचात दाखल करण्याची परवानगी मागीतली जी मान्य करण्यात आल्यानंतर अर्जदाराने ही तक्रार मंचात दाखल केली आहे.अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या तक्रारीत पुढे असे म्हटले आहे की, दिनांक ०२/०३/२००५ रोजी त्यांनी श्री लक्ष्मण किसनराव

गोरट्याल यांच्याकडुन घर खरेदी करतांना तिथे वीज पुरवठा नव्हता त्यामुळे वीजेची थकबाकी भरण्यास ते जवाबदार नाहीत. जुने वीज ग्राहक व थकबाकीदार असलेले श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल यांच्या तसे त्यांच्या कुटुबियांच्या नावे जालना शहरात महावितरण कंपनीकडुन अनेक वीज कनेक्शन देण्यात आलेले आहेत. पण महावितरण तर्फे त्यांच्याकडुन ही थकबाकी वसुल करण्यासाठी कोणतेही प्रयत्न करण्यात आलेले नाहीत. महावितरण कंपनीतर्फे त्यांना थकबाकी रक्कम भरण्याबाबत करण्यात आलेली मागणी रद्द करण्यात येवुन तसेच नवीन वीज पुरवठा करण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक ०६/०१/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार श्री भगवान दायमा उपस्थित होते. महावितरण तर्फे नोडल अधिकारी श्री सागजकर उपस्थित होते. त्यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला. ज्याची एक प्रत अर्जदारास देण्यात आली. नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या जवाबानुसार फेब्रुवारी २००५ मध्ये श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल यांचा थकबाकीमुळे वीज पुरवठा तात्पुरता खंडीत करण्यात आला व फेब्रुवारी २००८ मध्ये तो कायम स्वरूपी बंद करण्यात आला असल्याचे म्हटले आहे. श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल याच्याकडे डिसेबर २००५ पर्यत एकुण थकबाकी १९७४५०/-रूपये तर जुलै २००८ पर्यत २५१९७३.२७ अशी असल्याचे त्यांनी आपल्या जवाबात पुढे म्हटले आहे. नोडल अधिकारी यांनी सांगितलेला तात्पुरता व कायम स्वरूपी खंडीत करण्यात आलेल्या कालावधी पाहील्यानंतर मंचाने त्यांना तात्पुरता व कायम स्वरूपी वीज पुरवठा खंडीत करण्यात आलेला अहवाल मंचात दाखल करण्याचे सांगितले. तसेच श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल यांच्या नांवे इतर जागेत विज पुरवठा केलेला असल्यास त्याबाबतची माहीती पुढील सुनावणीच्या वेळी दाखल करण्याचे आदेश दिले. याप्रकरणाची पुढील सुनावणी जालना येथे दिनांक १७/०१/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३) दिनांक १७/०१/२००९ रोजी महावितरणच्या प्रशिक्षण विभाग, जालना येथे घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार श्री भगवान दायमा तसेच महातवितरण तर्फे नोडल अधिकारी श्री सागजकर तसेच लेखा विभागातील श्री सातपुते व श्री खडके उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी मागील सुनावणीच्या वेळी मंचाने मागणी केलेली कागदपत्रे दाखल करण्यासाठी मुदतवाढ मागितली. अर्जदार श्री भगवान दायमा यांनी श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल यांच्या नांवे जालना शहरातील इतर वीज कनेक्शन बाबतीत माहीती देण्यात महावितरणचे संबंधीत अधिकारी सहकार्य करीत नसल्याचे सांगितले. श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल यांनी वीज बिल भरणापोटी दिलेला धनादेश न वटता परत आल्याची माहिती व याबाबत महावितरण तर्फे कोणतीही कृती करण्यात आलेली नसल्याचे त्यांनी मंचाच्या निदर्शनास आणुन दिले. श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल यांचे नांवे प्रीतीसुधानगर, नेहरू रोड व काद्राबाद येथे वीज जोडणी असल्याचे त्यांनी सुनावणी दरम्यान सांगितले. मंचाने याबाबत तसेच न वटता परत आलेल्या चेक बाबत माहीती पुढील सुनावणीच्या वेळी दाखल करण्याचे नोडल अधिकारी यांना आदेश दिले व पुढील सुनावणी दिनांक २७/०१/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

४) दिनांक २७/०१/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी दिनांक २३/०१/२००९ रोजीच्या पत्रासहीत सी.पी.एल. तसेच वीज बिल दुरूस्ती प्रस्ताव प्रत मंचात दाखल केली. नोडल अधिकारी यांनी श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल यांच्या नांवे असलेल्या ( ग्राहक क्रमांक ५९००३०१६२८३६) फेब्रुवारी २००५ पर्यत १३६०६३.२० रूपये थकबाकी व ४८४१२.७८ व्याजासहीत एकुण १,८४,४७५.९८ एवढी एकुण थकबाकी असल्याचे म्हटले आहे. त्याचप्रमाणे श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल यांनी थकीत वीज बिलापोटी, दिनांक ३०/०३/२००२ रोजी दिलेला रूपये ३७८४०/- रूपयाचा धनादेश न वटल्यामुळे परत आल्याचे मान्य करीत ही रक्कम मे २००२ मध्ये देण्यात आलेल्या वीज बिलात पुन्हा समाविष्ठ करण्यात आली असल्याचे म्हटले आहे. या न वटलेल्या चेकबाबत कोणतीही कारवाई करण्यात आली याबाबत मंचाने

विचारणा केली असता याबाबत माहीती उपलब्ध नसल्याचे त्यांनी आपल्या जवाबात म्हटले आहे. अर्जदाराने ही थकबाकी लिमीटेशन कायदा प्रमाणे आता वसुल करता येत नसल्याचे सांगितले. पण मंचाने आदेश दिल्यास काही रक्कम भरण्याची तयारी दर्शविली. अर्जदाराने मा.उच्च न्यायालय यांनी संबंधित एका प्रकरणी दिलेल्या निकालाची बातमी असलेली कागदपत्रे मंचात दाखल केली. नोडल अधिकारी यांनी याप्रकरणी वरीष्ठ अधिका-यांचा सल्ला घेवुन पुढील सुनावणीच्या वेळी कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी मागितली. मंचाने नोडल अधिकारी यांची विनंती मान्य करीत पुढील सुनावणी दिनांक १०/०२/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

५) १०/०२/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीच्या वेळी अर्जदार तसेच नोडल अधिकारी यांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणुन श्री खडके उपस्थित होते. त्यांनी अर्जदाराने जुनी थकबाकी म्हणुन १,७१,८७९.४९ भरल्यास वीज पुरवठा करण्याची तयारी दर्शविली. अर्जदाराने श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल यांच्या नांवे असलेली जालना शहरात देण्यात आलेल्या इतर वीज पुरवठ्याबाबत माहीती मंचात दाखल करण्यासाठी तीन आठवड्याची मुदत देण्याची विनंती केली. मंचाने अर्जदार व नोडल अधिकारी यांना अतिरिक्त कागदपत्रे दिनांक ०५/०३/२००९ पर्यत दाखल करण्याचे आदेश देत प्रकरण निकालासाठी ठेवले.

६) अर्जदारने कागदपत्रे दाखल करण्यासाठी तीन आठवड्याची मुदतवाढ मागितल्यामुळे याप्रकरणी मंचस आदेश पारीत करण्यासाठी दिलेल्या मुदतीपेक्षा दोन आठवड्याचा कालावधी जास्त लागला आहे.

७) अर्जदार, श्री भगवान दायमा यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्राचे, मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिनांक ११/१२/२००८ रोजी दिलेल्या आदेशाचे तसेच मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोग यांनी अर्जदारास

लिहीलेल्या पत्राचे निरीक्षण केल्यावर अर्जदाराने या मंचात दिनांक १८/१२/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीच्या वेळी ही तक्रार अन्य कोणत्याही मंचात/न्यायालयात प्रलंबित नसल्याचे दिसुन येते. अर्जदाराने श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल यांच्याकडुन सिटी सर्व्हे नं. ४२७५ वरील मालमत्ता खरेदी करून दिनांक ०२/०३/२००५ रोजी त्यांची संबंधीत विभागाकडे नोंदणी केल्याचे नोंदणी क्रमांक ७९४/२००५ वरून स्पष्ट होते. अर्जदाराने दिनांक ३१/१२/२००५ रोजी महावितरण कंपनीकडे नवीन वीज पुरवठा मागणी करीत योग्य त्या कागदपत्रासहीत अर्ज दाखल केला. अर्जदाराने दाखल केलेल्या या अर्जावर संबंधित उपकार्यकारी अभियंता यांनी दिनांक १८/०१/२००६ रोजी च्या पत्राद्वारे त्या जागेवर असलेल्या १,९९,३२०/- रूपयाचा थकबाकीचा भरणा केल्याशिवाय नवीन वीज पुरवठा करता येणार नाही असे कळविले. महावितरण कंपनीने नवीन वीज पुरवठा करण्यास नकार दिल्यामुळे अर्जदाराने मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचीका (याचीका क्रमांक १६/१०/२००६) दाखल केली. नंतर ती याचिका परत घेवुन मा. उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपीठ यांच्या परवानगीने या मंचात तक्रार दाखल केली आहे. नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या जवाबात जुने वीज ग्राहक लक्ष्मण किसन गोरंट्याल यांचा वीज पुरवठा फेब्रुवारी २००५ मध्ये तात्पुरता खंडित करण्यात आला व तो फेब्रुवारी २००८ मध्ये कायमस्वरूपी बंद करण्यात आला असल्याचे म्हटले आहे. पण त्यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरून कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडीत केलेली तारीख ही दिनांक २५/१०/२००७ अशी असल्याचे स्पष्ट होते. नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या सि.पी.एल.चे निरिक्षण केल्यावर लक्ष्मण किसन गोरंट्याल यांनी जुन २००१ मध्ये शेवटचे वीज बिलाचा भरणा केलेला असल्याचे दिसुन येते.दिनांक ३०/०३/२००२ रोजी त्यांनी थकीत वीज बिलापोटी दिलेल्या ३७८४०/- रूपयाचा धनादेश न वटता परत आल्यामुळे मे २००२ मध्ये त्यांच्याकडे असलेल्या थकबाकी रक्कमेत ही रक्कम जमा करून मे २००२ मध्ये एकुण थकबाकी रक्कम ५८०५६/-रूपये अशी दाखविण्यात आलेली दिसुन येते. यावरून महावितरण कंपनीने अर्जदाराने

वीज बिल भरलेले नसतांना देखील जुन २००१ ते फेब्रुवारी २००५ या काळात त्यांचा वीज पुरवठा खंडित केलेला नाही हे स्पष्ट होते. तसेच ३०/०३/२००२ रोजी लक्ष्मण किसन गोरंट्याल यांनी दिलेला ३७८४०/- रूपयाचा धनादेश न वटता परत आलेला असतांना संबंधित वीज ग्राहकावर कोणतीही कारवाई केल्याचे दिसुन येत नाही. नोडल अधिकारी यांनी देखील आपल्या जवाबात धनादेश न वटल्या प्रकरणी तसेच जुन २००१ ते फेब्रवारी २००५ या काळात थकबाकीमुळे ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित न करण्याबाबत संबंधित अधिका-या विरूध्द केलेल्या कारवाई बाबत कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे सांगितले. यावरून याप्रकरणी महावितरणतर्फे संबंधित अधिका-यावर कोणतीही कारवाई केलेली नसल्याचे स्पष्ट होते. संबंधित ग्राहकास थकबाकी असतांना सुध्दा वीज पुरवठा खंडित न करता अप्रत्यक्षपणे मदत केली असल्याचे व पर्यायाने महावितरण कंपनीचे आर्थीक नुकसान केल्याचे स्पष्ट होते. मंचाने सुनावणी दरम्यान नोडल अधिकारी यांना श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल यांच्याकडे किंवा त्यांच्या संस्थेस अथवा कायदेशीर वारसांना जालना शहरात अन्य ठिकाणी विद्युत पुरवठा दिला असल्याबाबतची कागदपत्रे दाखल करण्याचे सांगीतले पण नोडल अधिकारी यांनी याबाबत कोणतीही माहीती मंचात दाखल केलेली नाही. अर्जदाराने माहीती अधिकार २००५ कायदयाखाली ही माहिती मिळवुन ती मंचात दाखल केली असुन त्यावरून श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल यांच्यासंस्थेस/कायदेशीर वारसांना खालील ठिकाणी वीज पुरवठा करण्यात आल्याचे दिसुन येते.

| | | |
|---|---|---|
| १) सौ.पार्वतीबाइ लक्ष्मण गोरंट्याल | ग्राहक क्रमांक | ५१००३०३४०७९३ |
| २) किसन व्यंकय्या गोरंट्याल<br>मजुर छाप बिडी, नेहरू रोड | ग्राहक क्रमांक | ५१००३०१०४२५९ |
| ३) किसन व्यंकय्या गोरंट्याल<br>मजुर छाप बिडी लोहाबाजार जालना | ग्राहक क्रमांक | ५१००३०००१२६३ |

४) मे अंबर हॉटेल ( नोंदणी क्रमांक जालना हॉटेल/४५७/१९८५ ), जालना श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल हे यात भागीदार आहेत.

श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल यांच्याकडे असलेली थकबाकी वसुल करण्यासाठी महावितरण कंपनीकडुन कोणतीही कायदेशीर कारवाई करण्यात आल्याचे दिसुन येत नाही. अर्जदाराने ३१/१२/२००५ रोजी नवीन वीज पुरवठा मिळण्यासाठी अर्ज केल्यानंतर दिनांक १८/०१/२००६ रोजी पत्राव्दारे सदरील जागेवर थकबाकी असल्याचे सांगत ती रक्कम भरल्याशिवाय वीज पुरवठा करता येणार नसल्याचे अर्जदारास कळविण्यात आले. नवीन वीज कायदा २००३ अस्तीत्वात आल्यानंतर महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने वीज पुरवठा अधिनियम २००५ (वीज पुरवठा व संहीता) प्रसीध्द केली ज्याचे पालन करणे महाराष्ट्रातील वीज वितरण करण्या-या सर्व कंपन्याना बंधनकारक आहे.या अधिनियामातील कलम १०.५ हे खालील प्रमाणे आहे.

जर मृत ग्राहक किंवा पुर्वीचा मालक/वहीवाटदार,जसे असेल तसे,यांनी विजेचा आकार किंवा विजेचा आकाराशिवाय अन्य कोणतीही वितरण परवानेधारकास देय असलेली रक्कम अदा करणे बाकी राहीले असेल तर तो बोजा,जागा ज्या कायदेशीर प्रतिनिधी/ कायदेशीर वारस किंवा जागेचा नवीन मालक/वहीवाटदार यांच्या नावे हस्तांतरित झाली असेल,जसे असेल तसे, यांच्यावर राहील आणि अशा कायदेशीर प्रतिनिधी/कायदेशीर वारस किंवा जागेचा नवीन मालक/वहिवाटदार यांच्याकडून वितरण परवनाधारक वसूल करेल.परंतु असे की,कायदेशीर वारसाला जोडणीच्या हस्तांतरणाच्या बाबतीत,विनियम १०.५नुसार येणारा बोजा, जास्तीत जास्त सहा महीने अगोदर पर्यंतच्या कालावधीत फक्त अशा जागेला पुरविण्यात आलेल्या वीजेच्या चुकत्या न केलेल्या आकाराइतकाच मर्यादीत राहील.

महाराष्ट्र वीज नियामक आयोग यांनी केलेल्या वरील अधिनियमानुसार अर्जदाराकडुन महावितरण कंपनीस वीज पुरवठा खंडीत केलेल्या तारखेच्या सहा महिने अगोदरच्या जुन्या ग्राहकाच्या वीज वापराची रक्कम वसुल करता येते.नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या सी.पी.एल.वरून फेब्रुवारी २००५ मध्ये वीज पुरवठा खंडीत करण्यात आला होता त्यावेळी श्री लक्ष्मण किसन गोरंट्याल यांच्या नांवावर एकुण थकबाकी १,८६,४८७.१२/-रूपये अशी होती. या अगोदरच्या सहा महीने म्हणजेच ऑगस्ट २००४ पर्यंत दाखविण्यात आलेली एकुण थकबाकी रक्कम ही १,६७,३२०.७१/- अशी

आहे. सी.पी.एल.चे बारकाईने अवलोकन केल्यावर एप्रिल २००४ ते डिसेंबर २००४ या काळात मागिल रिडींग ३२१६४ व चालु रिडींग ३२१६४ अशी दाखवत व रिजेक्ट स्टेटस दर्शवित २८९ युनिट वीज वापराचे सरासरीवर आधारीत वीज बिल देण्यात आलेले दिसुन येते. जानेवारी २००५ मध्ये मागिल रिडींग ३२१६४ व चालु रिडींग ३२४०६ अशी दाखवत (३२४०६-३२१६४) २४२ युनिट ऐवजी २८९ युनिट वापराचे वीज बिल देण्यात आलेले दिसुन येते. जुन्या ग्राहकाचा वीज पुरवठा फेब्रुवारी २००५ मध्ये तात्पुरता खंडीत करण्यात आला त्यावेळी सी.पी.एल.वर ३२४०६ अशी रिडींग दाखविण्यात आलेली असली तरी दिनांक २५/१०/२००७ रोजी वीज पुरवठा कायम स्वरूपी बंद करीत असतांना मिटरवरील रिडींग ही ३३३६१ अशी दाखविण्यात आलेली आहे. फेब्रुवारी २००५ मध्ये मिटर रिडींग घेतांना रिजेक्ट स्टेटस दाखविलेले असल्यामुळे वीज पुरवठा तात्पुरता खंडीत करीत असतांना मिटरवरील रिडींग ही ३३३६१ अशी असल्याचा निष्कर्ष काढता येतो. यावरून एप्रिल २००४ ते फेब्रुवारी २००५(१०महीने) या काळात अर्जदाराचा एकुण वीज वापर हा (३३३६१-३२१६४) ११९७ युनिट म्हणजे १२० युनिट प्रतिमहा असा असल्याचे स्पष्ट होते.फेब्रुवारी २००५ मध्ये जुन्या ग्राहकाचा वीज पुरवठा तात्पुरता खंडीत केल्यानंतर सहा महीन्यानंतर म्हणजेच ऑगस्ट २००५ मध्ये वीज पुरवठा कायम स्वरूपी खंडीत करणे नियामानुसार अपेक्षित होते.अधिनियम १०.५ नुसार येणारा बोजा सहामहीन्या अगोदर पर्यतच्या कालावधी इतका मर्यादीत असल्यामुळे अर्जदारास (१२० ६) ७२० युनिट वीज वापराचे बिल अधिक पुढील सहा महिन्याचा स्थिर आकार असे ही एकुण थकबाकी म्हणुन धरण्यात यावी असे मंचाचे मत आहे. अर्जदाराने वरील प्रमाणे देण्यात आलेल्या रक्कमेचा भरणा केल्यास व नविन वीज पुरवठा करण्यासाठी देण्यात येणा-या कोटेशनचा भरणा केल्यास तो नविन वीज पुरवठा मिळण्यास पात्र आहे.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने १२० युनिट प्रतिमहा याप्रमाणे एकुण ७२० युनिट वीज वापराचे वीज बिल थकबाकीपोटी अर्जदारास द्यावे.तसेच या वीज बिलात सहा महिन्याच्या कालावधीचे स्थिर आकाराचे बिल समाविष्ट करून ते तीस दिवसाच्या आत अर्जदारास द्यावे.

२) अर्जदाराने वरील प्रमाणे रक्कम भरल्यानंतर महाराष्ट्र राज्य विज आयोगाने पारीत केलेल्या अधिनियम २००५ अंतर्गत कृतीमानके नुसार अर्जदारास नविन वीज पुरवठा करावा.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.


**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१६३/२००८/८४** **दिनांक :-**

**प्रति,**

**श्री भगवान भवरलाल दायमा,**
**२-७-१२,नेहरू रोड जालना,**
**जिल्हा जालना.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१६३/२००८/८४ )

आपण दिनांक १८/१२/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. जालना.**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**